IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 6, Issue 7, June 2026

Impact Factor: 8.2

# मोनिका गजेंद्रगडकर यांच्या ‘आर्त’ कथासंग्रहाचे स्त्रीवादी आकलन

**भांगे सारिका मनोहर[१], प्रा. डॉ. रमेश अर्जुन शिंदे[२]**

संशोधक विद्यार्थी[१], संशोधक मार्गदर्शक[२]

मराठी विभाग व संशोधन केंद्र,

कर्मवीर भाऊराव पाटील, महा.पंढरपूर.

**सारांश** (Abstract) *: १९९० नंतर भारतातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती बदललेली आहे. १९७५ नंतर निर्माण झालेल्या दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी या साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात निर्माण झालेल्या चळवळी १९९० नंतर मागे पडल्या. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या प्रभावातून सामान्य माणसाच्या जगण्याचे संदर्भ बदलत गेले. याचा सगळ्यात मोठा परिणाम स्त्रियांवर, त्यांच्या एकंदरीत जगण्यावरच झालेला दिसतो. एकीकडे मूठभर स्त्रियांनी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्वकर्तृत्व गाजवलेले दिसते. तर दुसरीकडे स्त्रियांचा खूप मोठा वर्ग अजूनही मध्यमवर्गीय जीवन जगत असलेला दिसतो. या सगळ्याचे प्रतिबिंब अर्थातच स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्यात प्रभावीपणे पडलेले दिसते. कथासाहित्यही त्याला अपवाद नाही. उर्मिला पवार, सानिया, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा पवार यांचे कथासाहित्य त्यादृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.*

**की - वर्ड :** मोनिका गजेंद्रगडकर यांच्या ‘आर्त’ कथासंग्रहाचे स्त्रीवादी आकलन

## I. प्रस्तावना :

१९९० नंतर भारतातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती बदललेली आहे. १९७५ नंतर निर्माण झालेल्या दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी या साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात निर्माण झालेल्या चळवळी १९९० नंतर मागे पडल्या. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या प्रभावातून सामान्य माणसाच्या जगण्याचे संदर्भ बदलत गेले. याचा सगळ्यात मोठा परिणाम स्त्रियांवर, त्यांच्या एकंदरीत जगण्यावरच झालेला दिसतो. एकीकडे मूठभर स्त्रियांनी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्वकर्तृत्व गाजवलेले दिसते. तर दुसरीकडे स्त्रियांचा खूप मोठा वर्ग अजूनही मध्यमवर्गीय जीवन जगत असलेला दिसतो. या सगळ्याचे प्रतिबिंब अर्थातच स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्यात प्रभावीपणे पडलेले दिसते. कथासाहित्यही त्याला अपवाद नाही. उर्मिला पवार, सानिया, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा पवार यांचे कथासाहित्य त्यादृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

### मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथालेखन

१९९० नंतरच्या दशकातील मोनिका गजेंद्रगडकर हे मराठी कथासाहित्यातील एक लक्षणीय नाव आहे. त्यांच्या पहिल्याच 'भूप' या कथासंग्रहाने मराठी कथाक्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. यानंतर त्यांचे ‘आर्त’ आणि ‘त्रिपर्ण’ हे कथासंग्रह प्रकाशित झाले. आर्त हा २००८ साली प्रकाशित झालेला कथासंग्रह आहे. 'आर्त' या शब्दातच स्त्रीच्या वेदनेचा झंकार उमटलेला कळतो. या कथासंग्रहात ‘श्रद्धा’ , ‘बाबाची आई’ , ‘संक्रमण’ , ‘रुट्स’ , ‘जन्म’ आणि ‘नात’ या सहा दीर्घकथा आहेत. या दीर्घ कथांच्या माध्यमातून मोनिका गजेंद्रगडकर अन्यायाविरूद्ध लढा देणारी समर्थ स्त्रीप्रतिमा रेखाटतात. हेच मोनिकांच्या कथासाहित्याचे सूत्र आहे. महानगराच्या परिसरात या सर्व कथा आकार घेतात. मूलतः त्या कुटुंबकथा आहेत. मोनिकांच्या कथेतील पात्रे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय आहेत. या पात्रांद्वारे मानवी नातेसंबंधाचे विविध पदर, त्यातील ताणतणाव त्या चित्रित करतात. त्याचवेळी आधुनिक काळातील बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी समजूतदारपणा, सोशिकपणा आणि शांत, संयत वृत्तीचा अंगिकार करण्याचा मार्गही दाखवतात. म्हणूनच त्यांच्या कथांमध्ये येत असलेला कौटुंबिक संघर्ष उग्ररूप धारण न करता जीवनाविषयी श्रद्धा असलेला वाटतो. असे असले तरी आधुनिकीकरणाच्या आणि मानवी मूल्यांच्या पडझडीच्या काळात माणसामाणसांमधील जिव्हाळा, आपुलकी

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

वाहून तर जाणार नाही ना? हा प्रश्न त्यांना सतत भेडसावताना दिसतो आणि तो प्रश्न त्या आपल्या कथांमधून मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

अश्रद्धेय बनत चाललेल्या या समाजाला लेखिका आपल्या 'श्रद्धा' या कथेतून नेमका अर्थ सांगतात. त्या म्हणतात, "तुम्हाला तुमच्या मनाच्या अगदी तळापासून जे करावं वाटतं जे माणूस म्हणून तुमचा तुमच्यावरचा विश्वास वाढवत नेतं. तीच खरी श्रद्धा होय." 'श्रद्धा' या कथेतील नायिका यशोदा हिने आंतरधर्मीय सय्यदशी विवाह केला आहे. तिच्या कुटुंबात तिच्या धर्मामुळे कधीही वाद होत नाहीत. कुटुंबातील सगळे एकमेकांचा आदर करणारे आहेत. मात्र तिचा लहान मुलगा अर्शद हा आपल्या जीवनात घडणाऱ्या वाईट घटनांसाठी आईचा हिंदू धर्म कारणीभूत आहे असे म्हणतो. आईने धर्म बदलावा यासाठी तिच्यावर मानसिक, शारीरिक अत्याचार करतो. यशोदा ही या कथेची नायिका आणि तिच्या संवेदनशील स्त्री पात्राच्या अंतर्मनाभोवती ही कथा फिरताना दिसते. यशोदेचे आयुष्य तटस्थपणे तिच्याकडे पाहणाऱ्यांना सामान्य आणि स्थिर वाटते, परंतु तिच्या मनात चाललेली सततची भावनिक अस्वस्थता मोनिका गजेंद्रगडकर यांनी प्रभावीपणे मांडली आहे. अर्शदचा असा श्रद्धेपासूनचा अंधश्रद्धेपर्यंतचा प्रवास, त्यातून त्याचे अम्मीपासूनचे दुरावत जाणे मोनिका समर्थपणे चित्रित करतात.

'नातं' ही कथा नातेसबंधचे प्रांजळ रूप समर्थपणे साकार करते. या कथेतील उमाचे रवीसोबत लग्न होते. लग्नानंतर दीड वर्षातच रवीचा अपघाती मृत्यू होतो. घरातील सगळेच खचलेले असताना अचानक उमाच्या गरोदरपणाची बातमी समोर येते.. मुलगा तर गेला पण आता त्याचा अंश आपल्या घरात खेळेल या विचाराने रवीच्या आईला बरे वाटते. मात्र स्वतःच्या घराला वारस मिळावा म्हणून सुनेचे म्हणजेच उमाचे आयुष्य पणाला लावण्यास रविचे वडील नकार देतात. रवीचे वडील आपल्या सुनेने पुढच्या भविष्यासाठी, स्वतःसाठी दुसरे लग्न करावे म्हणून आग्रह धरतात. त्यासाठी स्वतः चांगला मुलगाही शोधू पाहतात.

'बाबाची आई' , 'संक्रमण' , 'जन्म' यांसारख्या कथांमधून नात्याचे विविध पदर उलगडत जातात. 'जन्म' , 'बाबाची आई' या कथा आईचे अ-पारंपरिक रूप साकार करतात. यातील 'जन्म' या कथेतील सत्यजितची आई अत्यंत आत्मविश्वासू आणि खंबीर आहे. कलेच्या क्षेत्रातील नवऱ्याची अरेरावी ती सहन करत नाही. आपल्या तत्त्वांचा तिला आदर आहे. यासाठी ती नवऱ्यापासून वेगळी होते. आपल्या मुलाला स्वतःच्या हिमतीने आपल्या कलेत पारंगत करते. मात्र हाच मुलगा जेव्हा मोठा झाल्यावर आपल्या वडिलांकडे जायचे आहे असे म्हणतो तेव्हाही ती त्याच्यावर अधिकारशाही न गाजवता जायला मोकळीक देते. पुढे वडिलांकडून भ्रमनिराश होऊन हा मुलगा नैराश्याच्या गर्तेमध्ये बुडून परत येतो. तेव्हाही ती त्याच्यासाठी खंबीरपणे उभी राहते. कुठल्याही गोष्टीचा बाऊ न करणारी ही आई मोनिका गजेंद्रगडकर यांनी रेखाटली आहे. 'बाबाची आई' या कथेत आपल्या अल्प बुद्धीच्या नवऱ्याला सोडून देऊन स्वतःसाठी, स्वतःच्या मुलीसाठी जगणारी आई दिसते. सासूबाईंना ज्याप्रमाणे आपल्या नवऱ्याची बायको होता येणार नाही. त्याप्रमाणे मलाही त्याची आई होता येणार नाही. दुसरे नातं स्वतःकडे ओढून घेत नात्यांची तडजोड करता येईल काय? हा राधाच्या आईने केलेला प्रश्न नवरा बायकोच्या नात्यातील शरीर संबंधाला असणारे महत्त्व सूचित करतो.

मुला मुलीत केला जाणारा भेदभाव 'संक्रमण' या कथेमध्ये चित्रित होतो. घराण्याचा वारस, वंशाचा दिवा हा मुलगाच असतो. या पुरुषसत्ताक विचारातून एका आईने आपल्या मुलीला कायमच दिलेले दुय्यमत्व ही कथा अधोरेखित करते. मुलगा न कमवणारा, कर्तृत्वशून्य, सूडबुद्धीचा आणि मुलगी मात्र अत्यंत हुशार, कर्तबगार, आत्मविश्वासू, नोकरी करून संपूर्ण कुटुंबाचा भार सांभाळणारी तरीही आईच्या नजरेत तिला काहीही महत्त्व नसते. तिने मिळविलेल्या कर्तुत्वाचा, यशाचा आनंद ती आपल्या आईसोबत साजरा करू शकत नाही. कारण आईला चिंता असते ती फक्त मुलाची. याही परिस्थितीत रेणू म्हणजेच या कथेची नायिका आपल्या आईला समजून घेण्याचा प्रयत्न करते. परंतु पुन्हा पुन्हा आईचं तेच बदलतं रूप पाहून रेणू विकल होते आणि विचार करते, "तुझ्यातल्या आईची किती आईपण.... परत मुलगा – मुलगी, वारस अशाच संक्रमणापर्यंत पोहोचणार तुझ्यातल्या आईच संक्रमण.. तुला समजून तरी कसं, किती घ्यायचं होतं मी?' मोनिका गजेंद्रगडकर यांच्या या दीर्घकथा वाचकाला अंतर्मुख करतात मानवी नातेसंबंधाबाबत नव्याने प्रश्न उभे करतात आणि अस श्रद्धेय होत चाललेल्या समाजाला श्रद्धेचा मार्गही दाखवतात. यातील बहुतेक स्त्रिया/नायिका मौनातून आपल्या मनातील विचार मांडताना दिसतात. परिस्थितीशी जुळवून घेताना विनाकारण आक्रस्ताळेपणा न करता तटस्थ राहून आपले स्वत्व जपताना दिसतात.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

## II. समारोप

आर्त' कथासंग्रहातून मोनिका गजेंद्रगडकर यांनी वेगवेगळ्या स्तरातील माणसांच्या जगण्यातील विकलता समोर आणली आहे. सूचक, संयत आणि अकृत्रिम शैली हे त्यांच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य आहे. व्याकुळता हे त्यांच्या कथांचा गाभा आणि सौंदर्य ठरले आहे. या दीर्घकथांच्या संग्रहात कथालेखिकेने नातेसंबंधांचा विविध अंगांनी वेध घेतला आहे. त्यांच्या कथा स्त्रीकेंद्री आहेत परंतु त्यामध्ये स्त्रीवादाचा तीव्र आक्रोश नाही. किंवा त्या पराकोटीचे बंड करतानाही दिसत नाहीत. धर्म, कला, वर्ण अशा विविध स्तरांवरून माणसांच्या जगण्यात निर्माण होत गेलेले ताण, त्यामुळे निर्माण होणारी आर्तता ह्या कथांमधून सामोरी येते. कथांनुभवांचे विविध पदर अस्सलपणे आणि तितक्याच सूक्ष्मपणे उलगडणारी त्यांची कथा माणसांच्या माणूसपणाचा अथांग वेध घेताना दिसते. माणसांच्या वेदनांची ती संयतपणे मांडणी करताना दिसते.

एकूण मोनिका यांच्या 'आर्त' या कथासंग्रहात मानवी नातेसंबंधाचे अनेक पदर उलगडले आहेत. काळाच्या बदलत्या रूपाची, प्रतिमेच्या आणि प्रतीकांच्या माध्यमातून केलेली मांडणी ही प्रसंगाचे प्रभावीपणे जपणारे आहेत. एका बाजूला कुटुंबाचा भार आहे तर दुसऱ्या बाजूला स्वतःचेही अस्तित्त्व आहे. या कात्रीत सापडलेल्या स्त्रीमनाची ही उलाघाल आहे. ती जितकी व्यक्तिगत आहे तितकीच सामाजिही आहे. मानवी जगण्यातील कृत्रिमपणा व्यक्त करताना कथेची भाषा जितकी हळवी बनते. तितकाच स्त्रीचा बाणेदारपणा मांडताना ती टोकदार होते. आजच्या घडीचा हा एका प्रकारचा स्त्रीजीवनाच्या विविधतेचा, तिच्या सामाजिक आणि राजकीय पातळीवरचा धांडोळा आहे.

## संदर्भ

१. आर्त, मोनिका गजेंद्रगडकर , मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००८.
२. स्त्रीवादी समीक्षा – स्वरूप व उपयोजन, डॉ. अश्विनी धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, २०००.
३. संदर्भासहित स्त्रीवाद – स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व, संपा. वंदना भागवत, अनिल सपकाळ. गीताली वि. मं., शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१४.